अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 04 डिसेंबर 2025 | वर्ष 11 वे | ✸ अंक 16 वा ✸ | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# बाजी कोण मारणार..? योगेश की सुयोग..!

## ब्रम्हपुरी नगर परिषदेकरीता ६७.९० टक्के मतदान

ब्रम्हपुरी/का.प्र.

अखेर ०२ डिसेंबरला मतदान प्रक्रिया पार पडली व उमेदवारांचे भविष्य इ.व्हि.एम. मशीनमध्ये बंद झाले. एकूण ३३,७७९ मतदारांपैकी २२,९३६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतांची टक्केवारी ६७.९० एवढी होती. ब्रम्हपुरी नगर परिषद निवडणूकीत नगराध्यक्ष पदाकरीता एकूण ४ उमेदवार रिंगणात होते. मात्र, काँग्रेसचे योगेश मिसार व भाजपाचे प्रा. सुयोग बाळबुध्दे यांच्यात प्रमुख लढत झाल्याचे चित्र दिसून आले. योगेशच्या नावात 'योग' आहे तसेच सुयोगच्या नावातही 'योग' आहे. परंतु, कोणत्या 'योग'च्या



सुयोग बाळबुध्दे (भाजपा)

गळयात नगराध्यक्ष पदाची माळ पडणार, हे २१ डिसेंबरला होणाऱ्या मतमोजणीतच प्रत्यक्ष कळणार आहे. बाजी कोण मारणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. उबाठाचे मिलिंद भनारे व बसपाचे निहाल ढोरे कोणाचे गणित बिघडविणार, याबाबत सुध्दा उलट-सुलट चर्चा सुरू आहे.

निवडणूक प्रचारादरम्या काँग्रेस व भाजपाचे उमेदवारांनी जीवापाड मेहनत करून मतदारांशी प्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतू मतदार अभिव्यक्त होत नव्हता. त्यामुळे अंदाज वर्तविणे कठिण झाले. मतदारांचा कौल कोणाचे बाजूने आहे, हे समजणे अवघड होते. मात्र, काँग्रेस-भाजपामध्ये चुरशी लढत पाहायला मिळाली. दोन्ही उमेदवारांनी विजयाचा दावा केला आहे.

ही निवडणूक आमदार



योगेश मिसार (काँग्रेस)

विजय वडेट्टीवार व माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्याकरीता प्रतिष्ठेची होती. मागील सत्रात काँग्रेसची सत्ता होती. ती टिकविण्यासाठी आम. वडेट्टीवार यांनी आपले संघटन कौशल्य पणास लावले. तर प्रा. देशकर यांच्याकरीता ही अस्तित्वाची लढाई मानल्या गेली. या निवडणूकीत राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी केलेल्या धनशक्तीचा वापर चर्चेचा विषय ठरला. नोकरदार वर्गानेही मतदानाच्या बदल्यात पैशाची मागणी केल्याचे दिसून आले. ही लोकशाही आहे की नोटशाही, असा प्रश्न उपस्थित झाला. शहरातील ११ प्रभागांचा आढावा घेतला असता यंदा पैशाचा पूर आल्याचे दिसत होते. मतदानाच्या दिवसापर्यंत एक मताचा दर १ हजारापासून ५ हजारापर्यंत गेल्याची चर्चा रंगली होती. तसेच उमेदवारांनी मद्य व मटण पार्ट्यांचा सर्रास वापर केल्याचे समोर आले.

११ प्रभागातून २३ नगरसेवक निवडून देण्यासाठी ९५ उमेदवार रिंगणात होते. बहुतेक प्रभागात काँग्रेसविरूध्द भाजप असाच सामना पहायला मिळाला. उमेदवारांनी सर्व पर्यायाचा वापर करून मतदारांना आकृष्ठ करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये कोण बाजी मारतो, हे मतमोजणी नंतरच कळेल. मतदान प्रक्रिया मात्र शांततेत पार पडली. कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. निवडणूक निर्णय अधिकारी सतिश मासाळ, सहा. निवडणूक अधिकारी डॉ. माधुरी सलामे व पोलीस निरिक्षक प्रमोद बानबले यांच्या नेतृत्वात पोलीस कर्मचाऱ्यांनी मतदान प्रक्रिया सक्षमपणे हाताळली.

## ब्रम्हपुरीच्या पूर्व नगराध्यक्षांचा कार्यकाळ

| अ.क्र. | नगराध्यक्षाचे नांव | कालावधी |
|---|---|---|
| १. | अशोक भैया | ०३/०२/१९९४ ते ०२/०२/१९९९ |
| २. | लक्ष्मीबाई सेलोकर | ०३/०२/१९९९ ते ३०/०३/२००० |
| ३. | वनिता ठाकूर | १८/०४/२००० ते ०३/०८/२००१ |
| ४. | वनिता ठाकूर | ०४/०८/२००१ ते ३१/०१/२००४ |
| ५. | छायाताई तुमाने | ०३/०२/२००४ ते ३१/०१/२००९ |
| ६. | अशोक भैया | ०३/०२/२००९ ते ०१/०८/२०११ |
| ७. | पवन मगरे | ०२/०८/२०११ ते ०८/०३/२०१३ |
| ८. | संदिप आमले | २१/१०/२०१३ ते ३१/०१/२०१४ |
| ९. | रिता उराडे | ०१/०२/२०१४ ते ३१/०७/२०१६ |
| १०. | योगिता बनपूरकर | ०१/०८/२०१६ ते ३१/०१/२०१९ |
| ११. | रिता उराडे | ०१/०२/२०१९ ते ३१/०१/२०२४ |
| १२. | ?--?--?--?--? | २०२५ ते २०२९ |

# नगर परिषद, नगर पंचायतींची मतमोजणी लांबली, कार्यकर्त्यांचा उत्साह मावळला

ब्रम्हपुरी/का.प्र.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयामुळे ०३ डिसेंबरला होणारी मतमोजणी आता २१ डिसेंबरला होणार आहे. गचाळ निवडणूक नियोजन केल्याबद्दल राज्य

### आता मतमोजणी २१ डिसेंबरला

निवडणूक आयोगावर चौफेर टिका होत आहे.

राजकीय कार्यकर्ते ०३ डिसेंबरला निकाल जाहीर होणार, या आशेने उत्साहित झाले होते. विजय मोर्चाची तयारीदेखील सुरू होती. पण अचानक नागपूर खंडपीठाचा आदेश आला अन् सर्वत्र निराशेचे वातावरण तयार झाले. आता २१ डिसेंबरपर्यंत वाट पाहावी लागणार आहे.

पाणी अडवा, पाणी जिरवा...



## संपादकीय...

# प्रश्नपत्रिकांची चोरी

ज्यात शिक्षक भरती नावाची प्रक्रिया गेली कित्येक वर्षे कोमात आहे. शिक्षणशास्त्राची पदवी घ्या, पदविका पूर्ण करा, फी भरा, वर्षानुवर्षे अभ्यास करा आणि नोकरी? अरे, आधी टीईटी-सीईटी नावाच्या 'पात्रता' नावाच्या पिंजऱ्यातून पार पडा! अशी स्थिती निर्माण झाली आहे. शिक्षण हा उज्ज्वल भविष्यासाठीचा मार्ग आहे हे आपण मुलांना शिकवतो; पण त्या मार्गावरच आज भ्रष्टाचाराचे खड्डे, गैरवर्तनाची दलदल आणि प्रश्नपत्रिका चोरीचे अंधारकोपरे उघड झाले आहेत.

पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे, अनिवार्य केल्यापासून विद्यार्थ्यांना एखाद्या रणांगणात उतरल्यासारखे वाटू लागले. प्रश्नपत्रिकांचे निकाल एक ते तीन टक्क्यांमध्ये झोके घेत होते. या भीषण परिस्थितीचा गैरफायदा घेत बाजारातील 'जुगाडू' टोळ्यांनी शिकवणीचा धंदा फोफावला. दोन महिन्यात कोट्यवधींची उलाढाल करणाऱ्या या वर्गांनी 'आमच्याकडे यशाची गुरुकिल्ली' अशी घोषणा करून विद्यार्थ्यांची पाकिटे रिकामी केली. परीक्षेचे पवित्र्य जपण्याऐवजी काहींनी तर थेट प्रश्नपत्रिका फोडण्याचे धाडस केले. लाखो रुपयांचा व्यवहार आणि शिक्षणक्षेत्राचा चेहरा काळवंडतच चालला.

सर्वोच्च न्यायालयाने आता सेवेत असलेल्या शिक्षकांनाही पात्रता परीक्षा अनिवार्य केली. ज्यांच्या कारकिर्दीत फक्त पाच वर्षे उरली आहेत, त्यांनाच सूट. उर्वरित सरकारी, खासगी, ग्रामीण, शहरी शिक्षकांना पुन्हा एकदा परीक्षा द्यावी लागत आहे. आणि याच संधीचा फायदा घेत बोगस प्रमाणपत्रे, फसवेगिरी आणि प्रश्नपत्रिका विक्रीचे नवे जाळे उभे राहिले आहे. प्रशासन एआय तंत्रज्ञान वापरून पारदर्शकता वाढवण्याचा प्रयत्न करत असताना प्रश्नपत्रिका बाहेर कशी पडते, हा प्रश्न जनतेच्या घशात अडकला आहे.

शिक्षण व्यवस्थेवरचा विश्वास खिळखिळा होणं, ही फक्त सुरुवात आहे. उद्या विद्यार्थी उत्तीर्ण झाला, तरी त्याच्याकडे संशयानेच पाहिले जाईल. 'अरे, तुझ्या हातातली उत्तरे कुठून आली?' असा प्रश्न त्याच्या आयुष्यभर पाठलाग करेल. लाखो रुपये मोजून परीक्षा फोडण्याचा नाद वाढला तर उद्या वर्गात शिक्षक म्हणून कोण उभा राहील? मेहनतीने पात्र झालेला की पैशाने मार्ग काढणारा ? अशा शिक्षकांकडून राष्ट्र कोणत्या तेजाने उजळणार?

बाजारीकरण, खासगीकरण, उदारीकरणाच्या दरवाजातून शिक्षणक्षेत्रात पैशाच्या भूकेचा महापूर शिरला. शिक्षण 'परिवर्तनाचे साधन' राहिले नाही, तर 'उद्योग' बनले. विद्यापीठे, महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था-सगळीकडे 'ॲडमिशन घे, भविष्य उज्ज्वल' हा नारा आता निव्वळ जाहिरातीचा फुगा ठरलाय. खरे भविष्य मात्र अंधारातच अडखळत आहे.

शिक्षक या पदाला आपण देवत्व दिले होते. ज्ञान देण्याचे कर्तृत्व, समाज घडवण्याची जबाबदारी आणि विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कार करण्याची ताकद या व्यवसायात होती. पण आज त्याच व्यवसायाच्या कपाळावर प्रश्नचिन्हांची करंजी माजली आहे. प्रशासनावर लोकांचा विश्वास उडाला तर संपूर्ण व्यवस्था थरथरेल. आणि हा थरथराट फक्त शिक्षणपुरता राहणार नाही, तो समाजाच्या पायाभरणीवर परिणाम करेल.

प्रश्नपत्रिका चोरणाऱ्यांवर कठोर कारवाई ही काळाची गरज आहे. हे केवळ गुन्हेगार नाहीत, तर भविष्यातील पिढ्या उद्ध्वस्त करणारे समाजद्रोही आहेत. शिक्षण भ्रष्ट झाले तर देशाचे भविष्यच गहाण पडते. आज परिस्थिती अशी आहे की, विद्यार्थी रात्रं-दिवस अभ्यास करत आहेत, पालक कर्ज काढून शिकवत आहेत, शिक्षक सेवेत असूनही घाबरलेले आहेत आणि काही मोजके लोक प्रश्नपत्रिकांच्या व्यवहारातून करोडोंचा माल काढत आहेत.

**अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...**
**www.bramhapurisamachar.com/bs**

# ने.हि. महाविद्यालयातील डॉ. अरविंद मुंगोले यांना राष्ट्रीय फेलोशिप

## फेलोशिप मिळविलेल्या तीघांपैकी एक ब्रम्हपुरीकर संशोधक

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील कार्यरत प्राध्यापक डॉ.अरविंद जनार्दन मुंगोले यांना 'नॅशनल इनवारमेंटयलिस्ट असोसिएशन' कडून नुकतीच अतिशय महत्त्वाची राष्ट्रीय फेलोशिप जाहिर झालेली असून त्यांची 'फेलो ऑफ द असोसिएशन'साठी निवड करण्यात आली आहे.

भारतातील फक्त तीन व्यक्तिंना त्यांच्या पर्यावरणावरील



संशोधन व विशेष कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात येते, त्यातील हे एक आहे. यापूर्वी त्यांना यंग साईंटीस्ट अवार्ड, डिस्टींग्वीश साईंटीस्ट अर्वाड मिळालेले आहेत. याशिवाय त्यांच्या नावावर सात भारतीय पेंटेंट असून जळपास पंचावन्न राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिंबध प्रकाशित आहेत आणि त्यांचे दहा ग्रंथ आज बाजारात उपलब्ध आहेत.

त्यांच्या या घवघवतील यशाबद्दल डॉ.अरविंद मुंगोलेंचे संस्थेचे अध्यक्ष श्रीमती स्नेहलताताई भैया, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश भैया, सचिव अशोक भैया, प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर व समस्त प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले असून पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा बहाल केल्या आहेत.

# महाराष्ट्र इंस्टिट्युट ऑफ फार्मसी बेटाळा येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाळा, येथे दि. २९ नोव्हेंबर २०२५ ला भव्य गुणवंत



विद्यार्थी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी व उद्घाटक मा. उमेशजी नागदेवे सचिव, एम.एस.बी. टी.इ.मुंबई तसेच डॉ. अनिल हिरेखन रजिस्ट्रार गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आणि मा.डॉ. नितीन डूमोरे प्रोफेसर व विभाग प्रमुख दादासाहेब बालपांडे कॉलेज ऑफ फार्मसी नागपूर हे प्रमुख अतिथी मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमात जे विद्यार्थी गोंडवाना विद्यापीठाच्या परीक्षेत गुणवत्ता श्रेणीत उत्तीर्ण झाले त्या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. बि.फॉम.अंतिम वर्ष, डी.फॉर्म अंतीम वर्ष, ए.डी.एम.एल.टी. अंतिम वर्ष तसेच तंत्रनिकेतन च्या सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल विभागाच्या गुणवत्ता श्रेणीत प्रथम व द्वितीय श्रेणीत प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणवत्ता ट्रॉफी व फोल्डर देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी सोहळ्याचे उद्घाटक उमेशजी नागदेवे यांनी सर्व विद्यार्थ्यांना अभ्यास व इतर कोणत्याही कामाचे नियोजन कसे करावे या बद्दल मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे डॉ. अनिल हिरेखन आणि डॉ. नितीन डुमोरे यांनी गुणवत्ता प्राप्त व इतर विद्यार्थ्यांना संघर्ष करून व्यक्ती कसा यशस्वी होतो, याबद्दलअप्रतिम असे मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र पिसे यांनी सुद्धा सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या विविध सुविधांचा योग्य उपयोग करावा तसेच उच्च शिक्षित व पारंगत शिक्षकांचे मार्गदर्शन घ्यावे आणि महाविद्यालयाचा, पालकांचा व गुरुजनांचे नावलौकिक होईल असा दृष्टिकोन बाळगावा, असो सांगत प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर वृंदास शुभेच्या दिल्या व सर्वांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा.चेतन चौधरी आणि आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन यांनी केले.

## विनोदिनी

एक बाबा किसी महफ़िल में गए... वहां सब उनका मज़ाक उड़ाने लगे...
बाबा ने कहा - देखो हम फ़क़ीर लोग हैं, हमारा मज़ाक न उड़ाओ ... लोग खूब हंसे... और अचानक उन सबको दिखना बंद हो गया..
वे अंधे हो गए ... वो सब बाबा के कदमों में गिर गए ... और बोले, 'बाबा जी हमें माफ़ कर दो..' ??
बाबा जी ने जूता उतारा और सबके एक-एक मारा
फिर बोले - अरे... अंधो लाइट चली गई है... कोई जेनरेटर ऑन करो, मुझे भी दिखाई नहीं दे रहा है ...!!!

# कर्मयोगी तुकारामदादा गीताचार्य जयंतीनिमित्य वेबसाईटचे उद्घाटन




ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक ०१ डिसेंबर २०२५ सोमवार रोज गीताजयंती व कर्मयोगी संत प. पु. तुकारामदादा गीताचार्य यांची १११ वी जयंती चा उत्सव भु-वैकुंठ अड्याळ टेकडी येथे सुबोधदादा मार्गदर्शक व संचालक भु-वैकुंठ अड्याळ टेकडी यांच्या प्रमुख मार्गदर्शनात संपन्न झाला.

प्रसंगी दुपारी ०१ वाजता सत्संग भवन येथून भव्य रामधून काढण्यात आली. गुरुपद गुंफा चरण पादुकांचे पूजन केले. नंतर प. पु. तुकाराम दादा गीताचार्य यांच्या समाधीचे पूजन करून संकल्परुपी कार्यक्रमास सुरुवात झाली. या निमित्ताने अड्याळ टेकडी च्या जागतिक प्रचारासाठी https://gramgita.com ही वेब साईट प्रकाशित करण्यात आली. प्रास्ताविक मध्ये डॉ. नवलाजी मुळे अध्यक्ष अड्याळ टेकडी यांनी गीताजयंतीचे महत्त्व विषद केले. उषाताई नारखेडे यांनी सर्वांना तन-मन-धन व श्रमदान करण्या संबंधाने मार्गदर्शन केले. सुश्री रेखाताई यांनी प्राप्त परिस्थितीत कार्य करण्यासाठी मार्गदर्शन केले.

समारोपीय मार्गदर्शनात सुबोधदादा मार्गदर्शक व संचालक अड्याळ टेकडी यांनी सांगितले की, अड्याळ टेकडी ही स्वावलंबन, स्वयंशासन व स्वयंपूर्णता या तत्त्वावर आणि आत्मशक्ती व जनशक्ती च्या आधारे कार्य करणारा लोकशाही व ग्रामस्वराज्याचा ग्रामगीताप्रणित आदर्श प्रयोग आहे. म्हणून पु. दादांनी या प्रयोगास सरकारी खात्यात पंजीबद्ध (रजिस्ट्रेशन) नोंदले नाही. निव्वळ लोकसहयोगातून अड्याळ टेकडीवर मौन साधना, अध्यात्म गुरुकुल, शेती, गोरक्षण, महिला सक्षमीकरण, योग निसर्गोपचार, पंचगव्य चिकित्सा, आयुर्वेदिक चिकित्सा, युवकांसाठी जीवन शिक्षण उन्हाळी शिबीर, ग्रंथ साहित्य प्रकाशन, ग्रामनिर्मान सप्ताह, पंचायत राज व ग्रामसभा प्रशिक्षण इत्यादी प्रयोग सुरू आहेत.

जगाच्या पाठीवर हा एक अभिनव व अद्वितीय प्रयोग असल्यामुळे यात विविध प्रांत व राज्यातील लोक मोठ्या प्रमाणात जुळत आहेत. जगातील सर्व लोकांना या प्रयोगाचा लाभ मिळावा म्हणून अड्याळ टेकडीवरून पु. तुकारामदादा गीताचार्य जयंती निमित्ताने https://gramgita.com ही वेबसाईड प्रक्षेपित करण्यात आली. यामुळे अड्याळ टेकडीचे तत्वज्ञान व येथील सर्व कार्य प्रयोग जगात सर्वदूर उपलब्ध होईल. पुणे चे डॉ मनीष नारखेडे व डॉ महेश कोलते यांच्या सहयोगातून सदर वेब साईट निर्माण झाल्यामुळे प्रसंगी सर्व गुरुदेव भक्तांनी त्यांचे टाळ्या वाजवून स्वागत व अभिनंदन केले. या जागतीक प्रचार-प्रसार प्रकाशन विभागाच्या या कार्यासाठी गुरुदेव भक्तांनी विविध आर्थिक संकल्प दान केले व अशाद्वारे पु. दादांची संकल्परूपी जयंती साजरी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुश्री रेखाताई यांनी केले, सदर कार्यक्रमाला किशोर तिडके, लालचंदजी नखाते, मारोती साव, विजयची देरकर इ. मान्यवर उपस्थित होते.

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये ‘हॅण्डवॉश डे’ उपक्रम उत्साहात साजरा



ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक एल. एम. बी. पब्लिक स्कुल मध्ये दि. १ नोव्हेंबर २०२५ ला रोज शनिवारला Handwash Day हा उपक्रम प्रि-स्कूलच्या विभागात राबविण्यात आला.

एल. एम. बी. स्कुल ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबर स्वच्छतेचे महत्व बाळगते. कोणत्याही आजाराचे मुळ हे हात असतात. घाणीने माखलेले, अस्वच्छ हात हे वेगवेगळ्या आजारांना निमंत्रण देत असतात. त्यामुळे चांगल्या आरोग्यासाठी स्वत:चे हात नेहमी स्वच्छ धुणे महत्वाचे आहे. हाताच्या स्वच्छतेबाबत जागृती निर्माण करण्यासाठी स्कुलच्या वतीने एक प्रभावी उपक्रम म्हणून ‘हात धुवा दिवस’ उपक्रमाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देण्याचा हा शाळेचा छोटासा प्रयत्न. Handwash Day विषयी विद्यार्थ्यांना हात धुण्याचे महत्व त्याचबरोबर ते कसे धुतले जातील या विषयी सुध्दा माहिती दिली.

या मध्ये विद्यार्थ्यांनी दोन्ही हात पाण्याने ओले केले. त्यानंतर थोडेसे Handwash हातावर घेऊन त्याचा फेस केला व नंतर तळहातातील बोटांच्या मधील खाचा, हाताचा पृष्ठभाग यासह सगळीकडे Handwash व्यवस्थित लावायला सांगितले. त्यानंतर पाण्याने हात धुवून स्वच्छ टॉवेलने ते पुसून घ्यायला सांगितले. त्याचबरोबर मुलांना जेवण्याआधी, जेवनानंतर आणि खेळानंतर साबनाने किंवा Handwash ने आपले हात स्वच्छ करावे असे सांगण्यात आले.

आयोजित उपक्रमाला उपस्थित स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य, पर्यवेक्षिका या सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमाच्या सफलतेकरिता प्रि-स्कूल विभागातील सर्व शिक्षिकांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे संपूर्ण श्रेय शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांना जाते.

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

# ज्ञानोपासक विद्यालय, निलज येथे अपूर्व विज्ञान मेळावा





ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील ज्ञानोपासक विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय निलज येथे दि. २९ नोव्हेंबर २०२५ ला अपूर्व विज्ञान मेळावा, आनंद मेळावा व हस्तकला कौशल्य प्रदर्शनी यांचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन अण्णाभाऊ ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. मेळाव्यामध्ये ३५ वैज्ञानिक प्रयोग प्रतिकृती तसेच टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ आणि आकर्षक हस्तकला प्रदर्शन विद्यार्थ्यांकडून करण्यात आले. या आनंद मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध खाण्याच्या पदार्थाचे स्टॉल लावले होते. सोबतच माजी विद्यार्थ्यांचा मेळावा देखील घेण्यात आला.

मेळाव्यामध्ये निरुपा विद्यालय रुई, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निलज, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा रुई तसेच रुई निलज पाचगाव येथील ग्रामस्थांनी आस्वाद घेतला. मेळाव्यामध्ये अव्वल ठरलेल्या तीन प्रयोग, तीन उत्कृष्ट कलाकृती तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले.

याप्रसंगी शंकर जी कोपुलवार उपसरपंच ग्रा.पं. निलज, गोकुळजी कार उपसरपंच मांगली, माधुरीताई दोनाडकर उपाध्यक्ष शिक्षक पालक संघ, निरुपा विद्यालयाचे मुख्याध्यापक घोंगडे सर, जिल्हा परिषद शाळा निलजच्या मुख्याध्यापिका वासानिक मॅडम, कवडूजी बुल्ले, तसेच मनोज तिजारे, गुरुदेव ठाकरे, अरुण ठेंगरी, राहुल मैद इ. माजी विद्यार्थी, प्राचार्य धनराजजी चौधरी, पालक वर्ग, तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते.

संचालन हेमंत भावे यांनी तर प्रास्ताविक भोयर सर यांनी केले. आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# अवैध दारूसाठ्यावर उत्पादन शुल्क विभागाचा छापा

## आरोपीच्या घरातून जप्त केला ५ लाख १६ हजारांचा मुद्देमाल

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर तसेच जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार, १ ते ३ डिसेंबर या कालावधीत दारूबंदी लागू असताना उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई केली आहे. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ५ लक्ष १६ हजार २८० रुपये इतकी आहे. नागपूर विभागाचे राज्य उत्पादन शुल्कचे विभागीय उपायुक्त गणेश पाटील व चंद्रपूर राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.



गुप्त माहितीवरून, ब्रह्मपुरी तालुक्यातील मौजा उदापूर येथील ज्ञानेश्वर रामकृष्ण नाकतोडे याने अवैधरीत्या देशी व विदेशी दारूचा मोठ्या प्रमाणात साठा करून ठेवल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाला मिळाली. त्यानुसार शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास भरारी पथकाने आरोपीच्या घरी छापा टाकला असता मोठ्या प्रमाणात अवैध दारूसाठा आढळून आला. छापेमारीत दोन लिटर क्षमतेच्या विदेशी दारूच्या ११ बाटल्या, १८० मिली क्षमतेच्या विदेशी दारूच्या १९२७ बाटल्या, ९० मिली क्षमतेच्या विदेशी दारूच्या २२५ बाटल्या, ९० मिली क्षमतेच्या देशी दारूच्या २०० बाटल्या आढळून आल्या. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ५ लक्ष १६ हजार २८० रुपये इतकी आहे.

ही कारवाई दुय्यम निरीक्षक सोमेश्वर गव्हारे यांच्या नेतृत्वाखाली सुजित चिकाटे, संजय हरिणखेडे आणि सुकेशनी कारेकार यांनी केली. प्रकरणाचा पुढील तपास सोमेश्वर गव्हारे करीत आहेत.

**जल है तो कल है...**

# पथनाट्यातून मतदार जनजागृती

## ने.हि. महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाचे लोकोपयोग कार्य




ब्रम्हपुरी/का.प्र.

नगर परिषद ब्रम्हपुरी सार्वत्रिक निवडणुक २०२५ च्या अनुषंगाने मतदान जनजागृती कार्यक्रमाअंतर्गत मतदानाचे महत्व लक्षात घेत, NCC कॅडेट्स नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाचे विदयार्थ्यांनी पथनाट्य सादर करून जनजागृती मोहीम यशस्वी केली.

'मतदान करा, देश घडवा!' असे संदेश देत कॅडेट्सने एक नवा दृष्टिकोन दिला आहे. या पथनाट्याद्वारे, एनसीसी कॅडेट्सने आपल्या कार्यक्षेत्रातील नागरिकांना मतदानाच्या महत्त्वाबद्दल जागरूक करण्याचा प्रयत्न केला. 'आपला हक्क, आपला अधिकार' या थीमवर आधारित पथनाट्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पथनाटयात कॅडेट्सने मतदान न करण्याच्या गंभीर परिणामांवर प्रकाश टाकला, तसेच एकात्मिक समाज आणि सक्षम सरकार स्थापन करण्यासाठी मतदानाची आवश्यकता आहे. हे सांगितले.

सादर कार्यक्रम निवडणुक निर्णय अधिकारी सतिश मासाळ साहेब, सहायक निवडणुक निर्णय अधिकारी डॉ माधुरी सलामे मॅडम व अतिरीक्त निवडणुक निर्णय अधिकारी श्रीमती लीना बोबोटे यांच्या मार्गदर्शनात पार पडला.

# समाजोपयोगी उपक्रमांतून विहार मेश्राम यांचा वाढदिवस साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

सामाजिक बांधिलकी, शैक्षणिक विकास आणि युवक प्रोत्साहनाच्या क्षेत्रात सतत सक्रिय राहणारे विद्यार्थी मित्र व सामाजिक कार्यकर्ता विहार मेश्राम (ब्रह्मपुरी) यांनी यंदा आपला वाढदिवस अत्यंत आगळ्या पद्धतीने साजरा केला. औपचारिक उत्सवाला दुय्यम स्थान देत त्यांनी संपूर्ण दिवस समाजहित, पर्यावरण संरक्षण, वाचनसंस्कृती प्रसार आणि विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त अशा उपक्रमांना अर्पण केला. दिवसभर आयोजित कार्यक्रमांमुळे परिसरात उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.



दिवसाची सुरुवात 'निसर्गाचे रक्षण हीच खरी सेवा' या भावनेतून वृक्षारोपण करून झाली. तद्नंतर तुलानमाल येथील सत्यशोधक वाचनालयाला पुस्तकांचा संच भेट दिला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व माहितीपूर्ण साहित्य सहज उपलब्ध व्हावे, त्यांच्या शैक्षणिक विकासास चालना मिळावी या उद्देशाने करण्यात आलेल्या या उपक्रमाचे स्थानिक पातळीवर मोठे कौतुक झाले. तसेच विहार मेश्राम यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांसाठी मोफत स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

बक्षीस वितरण सोहळ्याला मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष शोभा मिळाली. या प्रसंगी प्रा. नरेश रामटेके (ब्रह्मपुरी), RTMNU नागपूरचे प्रा. प्रज्ञानंद माटे, लक्ष्य फिजिकल अकॅडमीचे संचालक प्रफुल नागापुरे, तसेच सामाजिक कार्यकर्ते मयूर चहांदे, सुनील साळवे, विवेक खरकाटे आणि शुभम राऊत उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम, सातत्य, सकारात्मक विचार आणि प्रामाणिकतेचे महत्त्व पटवून देत प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना स्वतः विहार मेश्राम यांनी सादर केली. अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून विहार मेश्राम यांनी आपला वाढदिवस समाजहिताला समर्पित करून प्रेरणादायी उदाहरण घालून दिले. समाजात सकारात्मकतेचा संदेश देणारे आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे हे उपक्रम सर्व स्तरांतून कौतुकास्पद ठरत आहेत.

**ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता**

**www.bramhapuri samachar.com/bs**

**या ऑनलाईन साईटला भेट द्या**

**बातम्यांकरीता संपर्क :**

मो. 9503100964

मो. 8275715315

# तुलानमाल येथे संविधान दिन साजरा



ब्रम्हपुरी/का.प्र.

सत्यशोधक वाचनालय आणि जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तुलान माळ यांच्या संयुक्त विद्यमाने तुलानमाल येथे २६ नोव्हेंबरला संविधान दिन साजरा करण्यात आला.

प्रसंगी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली. माजी पोलिस निरीक्षक प्रल्हादजी हानवाटे यांनी हिरवी झेंडी दाखवून स्पर्धेला सुरुवात केली. या स्पर्धेत पुरुष गटात यशवंत बावणे प्रथम, तन्मय हानवाटे द्वितीय, विश्वास बगळे तृतीय तर महिला गटात आरती प्रधान प्रथम, संतोषी बोरकर द्वितीय, गायत्री शहारे तृतीय ठरले. मुख्य कार्यक्रमाचे उदघाटन सरपंच राजकुमार कुतरमारे, अध्यक्ष प्रल्हाद हानवाटे, अतिथी संजय हानवाटे, कालिदास ठाकरे, सुरेश जगझापे, नंदलाल पिल्लारे, टीकाराम चौधरी, निळकंठ कांबळी, स्वप्नील हानवाटे, डाकरेश्वर बगळे, विजय कुंभारे, टीकाराम बोकडे,चंद्रशेखर चौधरी, नीलिमा यावलकर तर मार्गदर्शक म्हणून जगदीश मेहेर सर, होमराज लोनबाळे उपस्थित होते.

संचालन संघपाल चहांदे यांनी केले. या कार्यक्रमात विजेत्या स्पर्धक यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. प्रायोजक जगदीश मेहेर, प्रतिभा ठाकरे, संजय हानवाटे, प्रल्हाद हानवाटे यांनी सहकार्य केले.

# रेवडी संस्कृतीवर आरबीआयचे माजी गव्हर्नर सुब्बाराव यांची टिका

## रेवडी संस्कृतीतून देश उभा राहू शकत नाही...

ब्रम्हपुरी/का.प्र.

देशातील वाढत्या 'रेवडी संस्कृती' आणि प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांकडून केल्या जाणाऱ्या मोफत योजनांच्या घोषणांवर भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डी. सुब्बाराव यांनी कठोर टीका केली आहे. मोफत योजना तुम्हाला निवडणुका जिंकून देऊ शकतील, पण त्यातून देश उभा राहू शकणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

'कर्ज काढून मोफत वाटप' या लेखात सुब्बाराव यांनी म्हटले आहे की, मोफत योजना देण्यामागे राजकीय वर्गाने जणू काही सर्व आर्थिक गणिते सामूहिकपणे बाजूला ठेवली आहेत. या घोषणा बहुतांश वेळा कर्ज काढून पूर्ण केल्या जातात. आजच्या उपभोगाचा भार उद्याच्या करदात्यांवर ढकलणे, हे या धोरणाचे गंभीर परिणाम आहेत.

सरकारे कर्ज घेऊन मोफत योजनांवर खर्च करत असल्याने शिक्षण, आरोग्य आणि भौतिक पायाभूत सुविधा यांसारख्या क्षेत्रांतील गुंतवणूक खुंटत चालली आहे. हेच क्षेत्र दीर्घकाळात नागरिकांचे जीवनमान सुधारण्यास मदत करतात, असे ते म्हणाले, तसेच प्रत्येक मोफत योजना ही राजकीय अपयशाची स्वीकृती आहे. याचा अर्थ नेता नागरिकांना सांगतोय की, मी तुम्हाला सन्मानजनक उपजीविका आणि नियमित उत्पन्न देऊ शकत नाही. त्यामुळे सध्या हे घ्या आणि काम चालवा, अशी टीका सुब्बाराव यांनी केली.

राजकीय पक्षांनी स्पष्ट करणे बंधनकारक करावे!

या गंभीर समस्येवर उपाय म्हणून, सुब्बाराव यांनी केंद्र सरकारला मोफत योजनांसंदर्भात 'राष्ट्रीय आचार संहिता' तयार करण्याची मागणी केली आहे. या आचारसंहितेत मोफत योजनांवर किती खर्च करावा आणि त्याचा पैसा कुठून येणार, हे राजकीय पक्षांनी स्पष्ट करणे बंधनकारक करावे, असे त्यांचे मत आहे.

# २५ डिसेंबरला ब्रम्हपुरीत तेली समाजाचा वधू-वर परिचय, प्रबोधन व सत्कार मेळावा

ब्रम्हपुरी/का.प्र.

तेली समाजातील युवक-युवतींच्या उज्ज्वल भविष्यासाठी तसेच समाजहितासाठी कार्यरत असलेल्या श्री संताजी बहुउद्देशीय सेवा मंडळ, ब्रह्मपुरी आणि विदर्भ तेली समाज - महासंघ तालुका ब्रह्मपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने तेली समाज वधू-वर परिचय, प्रबोधन व सत्कार मेळावा २०२५ चे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात येत आहे. हा मेळावा २५ डिसेंबर २०२५, गुरुवार रोजी सकाळी १० ते ४ या वेळेत विठ्ठल रुक्मिणी सभागृह, आरमोरी रोड, ब्रह्मपुरी येथे पार पडणार असून समाजातील सर्व बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मेळाव्यात तेली समाजातील युवक-युवतींसाठी सुवर्णसंधी असणारे प्रत्यक्ष वधू-वर परिचय सत्र, समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, तसेच समाजाभिमुख प्रबोधनात्मक व्याख्याने आयोजित केली जाणार आहेत. गुणवंतांचा सत्कार समाजातील शिष्यवृत्ती मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच व्यवसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या नवोदय करीता निवड झाले यांचा विशेष गौरव केला जाईल. संबंधितांनी १ फोटो आणि गुणपत्रिका यांसह नोंद १० डिसेंबर २०२५ पर्यंत करावी.

वधू-वर नोंदणी सुरू समाजातील विवाह इच्छुक युवक-युवतींसाठी वधू-वर परिचय पुस्तिकेत नाव नोंदविण्याची संधी उपलब्ध आहे. नोंदणीची माहिती परिचय बायोडाटा व फोटो १० डिसेंबरपर्यंत सादर आवश्यक, नोंदणी शुल्क ऑनलाईन पे खाते हस्तांतर द्वारे स्वीकारले जाईल, नोंदणी झालेल्या जोडप्यांना कार्यक्रमात प्रत्यक्ष परिचय सत्रात सहभागी होता येईल.

झाडे लावा, झाडे जगवा...

# एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्यास मुदतवाढ

## ३१ डिसेंबरपर्यंत नंबरप्लेट बसविणे बंधनकारक

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्य परिवहन विभागातर्फे उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसवण्यासाठी ३० नोव्हेंबर पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर आता परिवहन विभागाकडून अंतिम मुदत वाढविण्यात आली आहे. वाहनचालकांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत नंबरप्लेट बसवणे बंधनकारक असल्याचे सांगितले आहेत. त्यामुळे आता अनेक वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे.

आतापर्यंत देण्यात आलेली ही पाचवी मुदतवाढ असून ही अंतिम असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे यानंतर एचएसआरपी नंबरप्लेट नसलेल्या वाहनांवर पथकाकडून कारवाई करण्यात येणार असल्याचे राज्याच्या परिवहन आयुक्तांकडून सांगण्यात आले. वाहनांची एचएसआरपी नंबर प्लेट ही एक विशेष प्रकारची हाय सिक्युरिटी प्लेट आहे.

वाचाल तर वाचाल..

**... QUOTES ...**

"Constitution is not a mere lawyers document, it is a vehicle of life and its spirit is always the spirit of age."
- Dr. B.R. Ambedkar

**चारोळी**

*त्यांच्या घरी असं काही महाभारत घडलं*
*कारण तो बायकोचा वाढदिवस विसरला...*
*त्याच तारखेला दर महिन्यात त्याने मग*
*वर्षभर तिचा वाढदिवस साजरा केला...*

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# महाराष्ट्र इंस्टिट्युट ऑफ फार्मसी, बेटाळा येथे

## नवप्रवेशित विद्यार्थी स्वागत सोहळा उत्साहात संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला, ब्रम्हपुरी येथे दि. ०१ डिसेंबर २०२५ ला २०२५-२६ सत्रामध्ये बी.फॉर्म प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे आगमन आणि स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. सचिन दुधे, एफ.डी.ओ. डॉ. सुहास साकरकर, आय.क्यू.ए.सी. इन्चार्ज डॉ. अनुप बारसागडे, रासेयो अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.कु. पूजा घुटके, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.कु. सविता वसाके मंचावर उपस्थित होते.

या प्रसंगी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटक डॉ. सुहास साकरकर यांनी नव विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना अप्रतिम असे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना बाहेर काढण्याची संधी तसेच व्यासपिठावर बोलण्याचे धाडस निर्माण व्हावे हाच उद्देश या कार्यक्रमांनी होतो आणि विचारांची आदान प्रदान सुद्धा होते असे आपल्या भाषणातून रासेयो अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी मि. फ्रेशर सोहम बावनकर तसेच मिस.फ्रेशर निधी चिलबुले यांची निवड, नियुक्त पंचाद्वारे करण्यात आली त्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देवून गौरविण्यात आले. या प्रसंगी शिक्षक वृंदा तर्फे विजेत्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांना भेट वस्तू देऊन त्यांचे स्वागत व अभिनंदन करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे संचालन रितिक लोडेलिवार, कु. अंकिता ब्राह्मणकर, कु. वसुधा गिरडकर, कु. वैष्णवी चुन्हे, प्रणाली गिरडकर, श्रीकांत देशकर तसेच हर्षल वाढीभस्मे यांनी केले. आभार प्रदर्शन स्टूडेंट कौन्सिलची अध्यक्ष कु. किरण येरुणकर हिने केले. संस्थेचे अध्यक्ष देवेंद्रजी पिसे आणि प्राचार्य डॉ सचिन दुधे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्वांचे अभिनंदन केले.

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा




ब्रम्हपुरी/का.प्र.

एल. एम. बी. पब्लिक स्कुल ब्रम्हपुरी येथे नेहमीच नवनविन कार्यक्रम घेतले जातात. २६ नोव्हेंबर २०२५ ला ७६ वा संविधान दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. हा दिवस आपल्या देशाच्या इतिहासातील अत्यंत महत्वाचा दिवस आहे. १९४९ साली याच दिवशी भारताचे संविधान स्विकारल्या गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत.

कार्यक्रमात स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम व पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेला वंदन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन ८ वा (अ) मधील स्वरा सडमाके या विद्यार्थीनीने केले. तसेच कार्यक्रमात संविधानावर आधारित अप्रतिम नाट्यकला ७ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांनी सादर केली. त्यात डान्स टिचर रश्मी झोडे मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# मतमोजणी लांबल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम

## ‘एमपीएससी’ संयुक्त पूर्व गट ‘ब’ परीक्षा पुढे ढकलणार?

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगरपालिका आणि नगरपंचायतींचे ०२ आणि २० डिसेंबरला होणाऱ्या मतदानाची मतमोजणी ही एकत्रित २१ डिसेंबरला होणार आहे. तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) महाराष्ट्र गट ‘ब’ अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा २१ डिसेंबरला होणार आहे. जिल्हा पातळीवर परीक्षेची संपूर्ण जबाबदारी ही जिल्हाधिकारी आणि महसूल विभागाकडे असते. जिल्हाधिकाऱ्यांसह महसूल विभागातील सर्व कर्मचारी हे २१ डिसेंबरला मतमोजणीत व्यग्र राहणार आहेत. त्यामुळे २१ डिसेंबरची संयुक्त पूर्वपरीक्षा होणार की पुन्हा पुढे ढकलली जाणार, असा संभ्रम विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दर वर्षी पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय), राज्य कर निरीक्षक (एसटीआय) आणि सहायक कक्ष अधिकारी (एएसओ) यासाठी संयुक्त पूर्वपरीक्षा घेतली जाते. यंदा ६७४ पदांसाठी जाहिरात देण्यात आली. यामध्ये सहायक कक्ष अधिकारी तीन, राज्य कर निरीक्षक २७९ पदे आणि पोलीस उपनिरीक्षकाच्या ३९२ पदांचा समावेश आहे. सुरुवातीला संयुक्त पूर्व गट ‘ब’ २०२५ (अराजपत्रित) परीक्षा ९ नोव्हेंबरला होणार होती. मात्र, महाराष्ट्राच्या काही भागांत आलेल्या पूर परिस्थितीमुळे राज्यसेवा परीक्षा पुढे ढकलण्यात आली. ती परीक्षा नोव्हेंबर महिन्यात झाल्याने त्याचा परिणाम संयुक्त पूर्वपरीक्षेवर झाला. यानंतर २१ डिसेंबरला संयुक्त पूर्वपरीक्षा घेण्याचा निर्णय झाला.

निवडणूक आयोगाने सुरुवातीला ०२ डिसेंबर रोजी मतदान आणि ०३ डिसेंबर रोजी मतमोजणीची तयारी केली होती. मात्र, न्यायालयीन खटल्यांचा पेच निर्माण झाल्याने तेथील मंगळवारी होणारी काही पालिकांमधील निवडणूक २० डिसेंबरला होणार आहे. त्यामुळे ०२ आणि २० डिसेंबर रोजी मिळून दोन्ही टप्प्यांतील मतदान पार पडल्यानंतर सर्व नगरपालिका व नगरपंचायतींचा निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर केला जाणार आहे. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आदेश दिले आहेत. त्यामुळे सर्व महसुली अधिकारी मतमोजणीच्या प्रक्रियेत व्यस्त राहणार असल्याने ‘एमपीएससी’ २१ डिसेंबरला परीक्षा घेणार की पुन्हा पुढे ढकलणार, असा संभ्रम विद्यार्थ्यांमध्ये आहे.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध

सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



# संविधान हे तुमच्या-आमच्या जगण्याचे पुस्तक - डॉ. विजय रेवतकर

ब्रह्मपुरी/का.प्र.

स्वातंत्र्य, समता, बंधूता आणि न्याय यावर आधारलेले संविधान हा भारतीय माणसांचा प्राण असून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांच्या हितासाठी समानतेची आखणी केली आहे. पण या संविधानातील मूलतत्वे आज आपण किती पाळतो ? यावर चिंतन करण्याची गरज आहे. कोणताही सत्ताधारी या देशाचा मालक नाही, तो सेवक आहे. लोकशाहीत लोक खऱ्या अर्थाने मालक असून लोकांच्या हाती सत्ता असली पाहिजे, त्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत. असे आज होते आहे काय? हा विचारही आपण केला पाहिजे, कारण भारतीय संविधान हे तुमच्या आमच्या जगण्याचे पुस्तक आहे. असे चिंतनशील विवेचन आरमोरी येथील महात्मा गांधी महाविद्यालयाचे डॉ विजय रेवतकरांनी काढले. ते येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय व शांताबाई महिला महाविद्यालय आयोजित ‘संविधान दिन कार्यक्रमा’त प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

विचारपीठावर अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर नरड, डॉ. राजेंद्र डांगे, डॉ वर्षा तर प्रमुख उपस्थितीत प्रा विनोद चंदनशिवे, डॉ. प्रकाश वट्टी उपस्थित होते. याप्रसंगी संविधान उद्देशिका वाचन करून सर्वांना शपथ देण्यात आली. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ शेकोकरांनी संविधानावर भाष्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ वर्षा चंदनशिवे, संचालन डॉ प्रकाश वट्टी तर आभार डॉ. हर्षा कानफाडेंनी मानले. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी, समस्त उपस्थित होते. यशस्वीतेसाठी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी समिती सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404